# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. १ फेब्रुवारी, २०१५ रोजी घेण्यात आलेल्या विक्रीकर निरीक्षक (पूर्व) परीक्षा-२०१४ चा निकाल दिनांक ४ जुलै, २०१५ रोजी जाहीर करण्यात आला आहे. तसेच दिनांक ५ एप्रिल, २०१५ रोजी घेण्यात आलेल्या राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१५ चा निकाल दिनांक २८ जुलै, २०१५ रोजी जाहिर करण्यात आला आहे. सदर दोन्ही परीक्षांकरीता आयोगाने जाहिर केलेल्या गुणाच्या सीमारेषेपेक्षा (Cut-off Line) जास्त गुण प्राप्त करुनही सदर परीक्षांच्या निकालात विचार न झाल्याबाबतची निवेदने काही उमेदवारांकडून प्राप्त झाली आहेत.

२. या संबंधात "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचंना**" मधील सूचना **क्रमांक ३.८.१** नुसार "**पूर्व परीक्षेकरिता गुणांची पडताळणी अथवा फेरतपासणी करण्याबाबतची निवेदने कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाहीत**" अशी तरतूद आहे. तरीही एक विशेष बाब म्हणून या निवेदनांचा आयोगाने विचार केला. विक्रीकर निरीक्षक (पूर्व) परीक्षा-२०१४ संबंधात ५२ उमेदवारांची निवेदने तसेच राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१५ संबंधात दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ पर्यंत ७४ उमेदवारांची निवेदने प्राप्त झाली. तथापि, पडताळणीअंती यातील एकाही उमेदवाराच्या गुणांमध्ये तफावत आढळून आली नाही व हया उमेदवारांतील कोणीही मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरत नाही. १२६ उमेदवारांच्या निवेदनांनुसार केलेल्या पडताळणीत आढळलेली उपरोक्त वस्तुस्थिती पहाता यापुढे अशी निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत.

( **विजया पडते** )
उप सचिव (परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

मुंबई
दि. ६ ऑगस्ट, २०१५